# वास्तुसोबती

> मांजरं अधिक आकर्षक दिसतात ती त्यांच
> राखाडीपासून हिरव्या (त्यातही पिस्ता,
> पिवळ्या ते तपकिरी भुऱ्या रंगाचे ते गोल
> वाटतात, पण मला मात्र त्यांच्या डोळ्या
> कमालीचं औ

• वर्षा पेंडसे-जोशी

मुंबईच्या उपनगरातील एका शांत सोसायटीत जिथे माझं बालपण गेलं, तिथे आम्ही एकूण ४ मांजरे पाळली. अर्थात वेगवेगळ्या वेळेस. प्रत्येक मांजराचा स्वभावविशेष लक्षात ठेवण्यासारखा होता. मांजर अवतीभवती असण्याचा तो काळ आणि आमची पूर्वीची सोसायटी यांची पक्की सांगड माझ्या मनात अशी कायमची बसली आहे की, दोन्हींचा स्वतंत्र विचार मनात येणं अशक्यच आहे. तो काळ भुरकन उडून गेलाय आणि काळानुसार सोसायटीचंही रुपडं बदललंय. पण तो मांजरकाळ आठवला की, अजूनही खूप फ्रेश वाटतं. आमचं पहिलं मांजर अतिशय शहाणं होतं. सर्वच बाबतीत. पण दुर्दैवाने कसलासा आजार होऊन ते आम्हाला सोडून गेलं. त्यानंतर आलेल्या मांजरांचीही बाब काही औरच होती.

पहिलं मांजर गेल्यानंतर बराच काळ घरात मांजराचा विषय निघाला नाही. त्याला विसरणं घरातल्या सगळ्यांनाच कठीण जात होतं. पण एक दिवस आई नेहेमीप्रमाणे ऑफिसमधून घरी आली. उजव्या खांद्याला नेहेमीची पर्स आणि डाव्या हातात प्लॅस्टिकची जाळीदार आणि घटमूठ अशी एक पिशवी. 'काय आहे?' माझा लगेच प्रश्न. ''अगं बघ तर. तुला आवडेलच,'' आई म्हणाली. आईने जमिनीवर पिशवी ठेवली. त्याचं तोंड उघडलं. मी अधीरपणे पिशवीच्या जवळ गेले. जाळीतून कुणीसं बघतंय असं वाटलं. नीट पाहिल्यावर आत दोन छोटे गोल डोळे दिसले. मग मामला ध्यानात आला. आत माऊ असणार नक्कीच!

''मांजर आहे?'' अतीव आनंदाने मी विचारलं. त्यावर आईने सांगितलं की, तिच्या मैत्रिणीच्या मांजरीला बरीच पिल्लं झाली. त्यापैकीच हे एक. आईने ऑफिसनंतर तिच्या घरी जाऊन त्यातल्या एकाला जाळीच्या पिशवीत घालून लोकल ट्रेनमधून घरी आणलं. यावर 'पिशवीत घातल्यावर शांत कसं काय बसलं, काहीच चुळबूळ केली नाही का? लोकलमधून गर्दीतून कसं आणलंस,' असले प्रश्न नंतर आईला विचारून भंडावून सोडलं.

बरं, आता गृहप्रवेश करून बराच वेळ झाला होता. पिशवीचं तोंड उघडून ठेवलंच होतं. उत्सुकतेने आम्ही भवती जमून गप्पा मारत बसलो होतो. त्याला बाहेर येण्यासाठी चुचकारून झालं. पुढे दुधाची वाटी ठेवून बघितली. म्हटलं, आपण आसपास आहोत, आपल्या चाहुलीने, आवाजाने गांगरलं असेल बिचा
बाहेर पडण्याचं नाव घेत नाहीये. एकदा वाटलं की
आत घालून बाहेर काढावं, पण म्हटलं नको अजून
आपण अनोळखी आहोत त्यामुळे जबरदस्ती नको
पहिल्याच दिवशी प्रसाद मिळायचा! शेवटी आम्हाला
आला. म्हटलं, यायचं तेव्हा येईल बाहेर, तर तोपर्यंत
आतमध्ये कंटाळा आल्यामुळे त्याने बाहेर पडण्याचा नि
असावा. कारण स्वारीने बाहेर डोकावून मुखकमल
आणि मग हळूच सर्व अंग बाहेर काढलं. काढलं तर
दिसली. स्वारी उशी आणि भिंतीच्या मध्ये गॅप असते
जाऊन लपली. आता काही वेळ तिथेच मुक्काम होता.
फिसफिस करून त्याला बोलावून पाहिलं, पण हे आ
बरं म्यावम्याव वगैरेचाही पत्ता नाही. ''श्याः हे अ
चालणार... असं काय हे...'' मी मनात म्हटलं. अ
तासांनी ते जरा धीट झालं कारण इकडे तिकडे हिं
आवाज त्याने सर्वांना ऐकवला. पण निश्चितच तेव्हा
आईला आणि इतर भावंडांना शोधत होतं बहुतेक.

''काय गं हे, काळं-पांढरंच तर आहे. सोनेरी
एखादं?'' तेवढ्यात माझी तक्रारही करून झाली. प
मी विसरूनही गेले. तळहातापेक्षा थोडं मोठं असं ते
पांढरं गोड पिल्लू होतं. त्याच्या शेपटीचं टोक गडद
पिल्लाचं नामकरण 'चिमा' असं करण्यात आलं. पुढे का
तिला (ती मांजरी होती) चिमा याच नावाने हाक मारत

मांजरं अधिक आकर्षक दिसतात ती त्यांच्या डो
असं माझं ठाम मत आहे. राखाडीपासून हिरव्या (त्या
गडद हिरवा), निळ्याशार आणि अगदी पिवळ्या
भुऱ्या रंगाचे ते गोल मणी बहुतेकांना लबाड आणि

ांमुळे, असं माझं ठाम मत आहे.
(वा), निळ्याशार आणि अगदी
इतेकांना लबाड आणि धूर्त वगैरे
ळपणा, थोडा वात्रटपणा आणि
सतं.

# मांजरपुराण !



वाटतात, पण मला मात्र त्यांच्या डोळ्यात खट्याळपणा, थोडा वात्रटपणा आणि कमालीचं औत्सुक्य दिसतं. त्या पारदर्शक डोळ्यांतली बाहुलीची उभी रेघ काळेखात पाहिल्ये कशी रुंदावते? कुठे काही खुसपूस झाली की त्या गोल किंवा बदामाच्या आकाराच्या डोळ्यांमध्ये प्रचंड कुतूहल दाटतं आणि मग या औत्सुक्यापोटी पुढे घडणारी मजेदार पळापळ तुम्ही चुकवलीत तर एका मोठ्या आनंदाच्या ठेव्याला तुम्ही मुकलायत! आमच्या पहिल्या मांजराच्या डोळ्यांमध्ये हिरवी झाक होती, तर चिमाच्या डोळ्यांचा रंग वाळक्या पानांसारखा होता. अर्थात, दोघांच्याही डोळ्यांत खट्याळपणा पुरेपूर दिसायचा. (चिमाच्या डोळ्यांत थोडा लबाडपणाही!) तसेच त्यांचे उभे कान! बहुसंख्य वेळ एक कान समोर असतो आणि दुसरा कान मात्र वारंवार कडेला टवकारायचा उद्योग प्रत्येक मांजराचा सदैव चालू असतो. अगदी निद्रावस्थेतही कान पुढेमागे करणं आपलं चालूच असतं. कदाचित आपल्या पाठीमागे शेजारच्या कॉलनीतल्या त्या चहाटळ मांज्या काय बोलत असतात, हे जाणून घेण्याच्या औत्सुक्यापोटी मांजरं असं करतही असतील. मांजराच्या कानाला त्याच्या नकळत हलकेच बोटाने पटकन स्पर्श करून बघा, संवेदनशील मांजर लगेच तो कान असा झटकेल आणि आरस्पानी डोळ्यांनी एक क्षण तुमच्याशी नजर मिळवून दटावेलही. चिमाला असा त्रास आम्ही भरपूर दिला. तिच्या शेपटीचं टोक तिच्या कानात घालणे किंवा तिला आरशासमोर नेणे असले सतावण्याचे उद्योगही चिक्कार केले.

निखळ करमणूक हवी असेल तर मांजर आणि आरशाची गाठ घालून द्या. पुढचा तासभर हसला नाहीत तर मला सांगा! मला आठवतंय, चिमाने पहिल्यांदा स्वतःला आरशात पाहिलं तेव्हा बाईसाहेब चक्क घाबरल्या होत्या. तिथनं आधी तिने धूम ठोकली, पण ही नवीन मांजरी कोण घरात शिरलीय हा विचारांचा भुंगा तिच्यामागे लागला असणार कारण हळूच, दबकत आणि कानोसा घेत घेत, शेपटी फुलारून थोड्या वेळाने ती परत आरशाजवळ आली. म्याव करून पाहिल्यावर कळलं की आरशातलीसुद्धा म्याव करते. मग जरावेळ म्यावम्यावचं सेशन झाल्यावर आरशावर एक डावली मारून झाली. तर तस्साच प्रतिसाद आरसावालीनेही दिला की! हे असं जवळजवळ अर्धाएक तास चालू होतं. चिमाचा एकंदर आविर्भाव, आरसावालीला देत असलेल्या हुलकावण्या आणि विविध पट्ट्यांमधलं म्यावम्याव पाहून हसून हसून पोटात दुखायची वेळ आली. या आणि इतर नानाविविध प्रकारे मांजरांशी खेळणं (आणि तितकंच सतावणं) इतकं केलंय ना की मांजरांशी खेळण्याचे एकशे एक मार्ग वगैरे पुस्तक आता मी लिहू शकेन.

म्हणता म्हणता चिमाबाई मोठ्या झाल्या. काय म्हणतायंत तुमच्या चिमाताई? लोक येताजाता विचारू लागले. आता आमच्या या उपवर कन्येची आम्हाला चिंता वाटू लागली, कारण घरापेक्षा पंचक्रोशीत फिरणे तिला जास्त आवडू लागलं. पण मार्जारजगतातील जगरहाटीनुसार तिने लवकरच बाहेर कोणीतरी 'खास' शोधून काढले आणि आम्ही चिंतामुक्त झालो. त्याचा परिणाम तिचं पोट वाढल्यावर लक्षात आलाच आणि मग वाटलं किती पटकन मोठी झाली! कालपर्यंत छोटी चिमा होती की ही!

आईने गॅलरीतल्या ओट्याखाली चादरीचा आडोसा लावून चिमासाठी स्वतंत्र खोली केली. आणि तिथल्या त्या वेताच्या टोपलीत चिमाने दोन (होय, फक्त दोनच) पुत्ररत्नांना जन्म दिला. दोघं स्वतंत्रपणे स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःची काळजी घेऊ शकतील तोपर्यंत चिमाने त्यांना वाढवलं, पण नंतर मात्र तिने बाहेर वेगळं जग शोधलं असेल म्हणा किंवा इतर काही कारण असेल, पण तिचा आमच्याकडचा वावर कमी कमी होत गेला. नंतर ती आम्हाला कधीही दिसली नाही.

varsha0714@yahoo.com